**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** भुसावळ तालुका

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0012 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 31/01/2023 20:08

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 31/01/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 31/01/2023

**Time From (वेळेपासून):** 15:18 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:58 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 31/01/2023 **Time (वेळ):** 19:58 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 018

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 31/01/2023 19:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** खडका ,भुसावळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a)**Name (नाव):** शेख अल्ताफ हुसेन गुलाम रसुल
(b)**Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** औळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वरणगाव रोड,हॉटेल ,सायलीमागे सुंदर नगर,भुसावळ,भुसावळ तालुका, जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वरणगाव रोड,हॉटेल ,सायलीमागे सुंदर नगर,भुसावळ,भुसावळ तालुका, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9168807869

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती मनिषा निलेश गायकवाड | | | 1. मोरेश्वर नगर साकेगांव शिवार , भुसावळ,भुसावळ तालुका, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रूपया | 100/ रूपये दराची 03 नोटा अ. पा. लावलेल्या. | 300.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

300.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
यातील वर फिर्यादी यांनी शेख कय्युम शेख फय्युम यांचे मालकीचा मौजे खडका ग्रामपंचायत हधीतील सर्वे क्र. 24/1प्लाट नं.38 क्षेत्र 171.88 चौ.मी.चा प्लाट दुय्यम निबंधक कार्यालय भुसावळ यांचेकडे दस्त नोंदणी करून दि.21/12/2022 रोजी खरेदी केला होता. त्यानंतर दि.30/01/2023 रोजी यातील फिर्यादी यांनी सदर प्लॉटचे 7/12 उता-यावर नाव नोंद करून मिळण्यासाठी सजा खडका येथील तलाठी श्रीमती गायकवाड यांनी फिर्यादीचे 7/12 उता-यावर सदर प्लॉटची नोंद लावण्याचे मोबदल्यात यातील नमुद महिला आलोसे तलाठी यांनी फिर्यादीकडे 300/-रुपये लाचेची मागणी केली. त्या बाबत फिर्यादी यांनी दिनांक 31/01/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयाकडेस तक्रार दिली होती. सदर तक्रारीची ला.प्र.वि.जळगांव पथकाने दोन पंचासमक्ष दिनांक-31/01/2023 रोजी पडताळणी केली असता आलोसे यांनी फिर्यादी यांच्याकडेस घराचे 7/12 उता-यावर नाव लावण्याचे मोबदल्यात 300/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची रक्कम स्वीकारतांना त्यांना रंगेहात पकडण्यात आले तसेच सदर लाचेची रक्कम आज रोजी 15:18 वाजता वर नमुद ठिकाणी स्विकारली म्हणुन गुन्हा सोबत संगणिकृत केलेली फिर्याद जोडलेली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

VILAS VASANT SHENDE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी)

पोलीस ठाणे अंमलदार
पसावळ तालुका पोलीस

**Name** (नांव): VILAS VASANT SHEN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**फिर्याद**

भुसावळ तालुका पोलीस स्टेशन
दिनांक ३१/०१/२०२३

**मी शेख अल्ताफ हुसेन गुलाम रसुल, वय ३४ वर्षे, व्यवसाय मजुरी,**
**रा.वरणगाव रोड,हॉटेल सायलीमागे,सुंदर नगर,भुसावळ, जि.जळगांव**

समक्ष हजर राहुन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी माझे परिवारासह राहावयास असुन मोलमजुरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी दि.३०.०१.२०२३ रोजी सायंकाळी मी जळगांव अँन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयाचे पोलीस उपअधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांचेशी संपर्क साधुन खडका सजा येथील महिला तलाठी गायकवाड यांचे विरुध्द लाचे सबंधी तक्रार असल्याचे कळविले होते.तेव्हा मी पाटील साहेब यांना दि.३१.०१.२०२३ रोजी सकाळी ०९.०० वाजता आपणास भुसावळ वरणगाव हायवे रोडवरील वॉटरपार्क जवळ भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे दि.३१.०१.२०२३ रोजी सकाळी ०९.०० वा.मी माझे स्वतःचे मोटार सायकलसह भुसावळ वरणगाव हायवे रोडवरील वॉटरपार्क जवळ उपस्थित होतो. तेव्हा एक खाजगी तवेरा वाहन माझे जवळ येवुन थांबले व सदर वाहनात असलेले श्री.पाटील साहेब यांनी मला माझे नाव गाव विचारले व मला सदर वाहनात बसवुन घेतले. त्यांनतर श्री.पाटील साहेब यांनी स्वतःची सापळा अधिकारी म्हणुन ओळख करुन दिली त्यानंतर वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंच, सापळा पथकाचे कर्मचारी व माझी आपआपसात ओळख करुन दिली. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला माझी तक्रार पंचासमक्ष कथन करण्यास सांगीतली. त्यावरुन मी पाटील साहेब व पंचासमक्ष माझी तक्रार कथन केली. त्यानंतर मी कथन केलेली माझी तक्रार तवेरा वाहनात बसुन माझे स्वतःचे हस्ताक्षरात को-या कागदावर लिहून दिली ती खालील प्रमाणे आहे.

मी दि.२१.१२.२०२२ रोजी शेख कय्युम शेख फय्युम,रा.वरणगाव,खिडकी मोहल्ला,ता.भुसावळ यांचा मौजे खडके ग्रामपंचायत हद्दीतील विभाग क्र.०९.०४ मधील सर्वे क्र.२४/१ प्लॉट नं ३८ क्षेत्र १७१.८८ चौ.मी.चा संपुर्ण प्लॉट दुय्यम निबधंक कार्यालय,भुसावळ यांचेकडुन दस्त क्र.६१२८/२०२२ नोंदणी करुन ठरल्या बाजारभावा प्रमाणे मुद्रांक व नोंदणी शुल्क भरुन खरेदी केलेला आहे.

मी दि.३०.०१.२०२३ रोजी सदर खरेदी केलेल्या प्लॉटचा ७/१२ उताऱ्यावर माझे नाव लावण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज करुन खरेदीखतासह माझे प्रकरण गायकवाड मॅडम, तलाठी,सजा खडका,ता.भुसावळ यांचे कडे दिले होते. त्यावेळी तलाठी गायकवाड मॅडम यांनी मला सांगीतले की, " ७/१२ उताऱ्यावर तुमचे नाव लावायचे असेल तर तुम्हाला मला ३००/- रुपये द्यावे लागतील, पैसे दिल्यावरच मी तुमचा ७/१२ उताऱ्यावर नाव लावणे बाबतचा अर्ज दाखल करुन घेईल" असे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना ३००/- रुपयाची पावती मिळेल का? असे विचारले असता तलाठी गायकवाड मॅडम यांनी "अशी कुठलीही पावती मिळणार नाही"बाबत सांगीतले. व सदरचा अर्ज माझेकडुन घेउन त्यावर त्यांनी दाखल तारीख टाकुन सदरचा अर्ज मला परत करुन दिला. तेव्हा तलाठी गायकवाड मॅडम हे मी खरेदी केलेल्या प्लॉटचे ७/१२ उताऱ्यावर माझे नाव लावुन देण्याच्या मोबदल्यात माझेकडेस ३००/-रु. लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले.

तेव्हा मी तलाठी गायकवाड मॅडम यांना नंतर भेटतो असे सांगुन निघुन आलो आहे. मला तलाठी गायकवाड मॅडम यांना ३००/- रू.लाचेची रक्कम देण्याची मनापासुन इच्छा नाही. परंतु मी जर त्यांना लाचेची रक्कम दिली नाही तर ते मी खरेदी केलेल्या प्लॉटचे ७/१२ उताऱ्यावर माझे नाव लावणार नाहीत. म्हणुन मी नाईलाजाने तलाठी गायकवाड मॅडम यांना ३००/-रुपये लाचेची रक्कम देण्यास तयार झालो आहे. तसेच मी आज दि.३१.०१.२०२३ रोजी तलाठी गायकवाड मॅडम यांची भेट घेण्यासाठी तलाठी कार्यालय, खडका येथे जाणार आहे. त्याबाबत मी माझे स्वतःचे हस्ताक्षरात तक्रार दिली.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले होते. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला पंच क्रं.१ यांचेसह तलाठी श्रीमती गायकवाड यांची भेट घेण्यासाठी तलाठी कार्यालय, खडका येथे पाठविले होते. सदर वेळी माझी तलाठी श्रीमती गायकवाड यांच्याशी भेट झाली. त्यावेळी माझेत व तलाठी श्रीमती गायकवाड यांचेत माझे कामाविषयी बोलणी झाली. तेव्हा मी तलाठी श्रीमती गायकवाड यांना "मॅडम मी काल येउन गेलो होतो, ऑनलाईन सगळ खरेदीखत वगैरे आहे, किती दिवसात होईल, मला त्याच्यावर लोन काढायचे आहे" असे सांगीतले असता तलाठी श्रीमती गायकवाड मॅडम यांनी साधारणता एक ते दिड महिना प्रोसेस करायला लागतात, मी तुमचे एक महिन्यात प्रोसेस करुन देते असे सांगुन, ३००/- रुपये लाच रकमेची मागणी केली. तेव्हा मी तलाठी गायकवाड मॅडम यांना थोडया वेळाने येतो असे सांगुन सापळा पथका जवळ परत आलो होतो.

31.1.2023

मी परत आल्यानंतर, माझे कडे असलेले व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्ड मध्ये असलेले ध्वनीमुद्रीत संभाषण पोलीस उप अधिक्षक पाटील साहेब व पंच, सापळा पथक यांनी ऐकल व ऐकविले. त्यावरुन माझी व तलाठी गायकवाड मॅडम यांचेत झालेली लाचे संबधी बोलणी पाटील साहेब व सापळा पथकाने पंचासमक्ष ऐकली त्यावरुन तलाठी गायकवाड मॅडम यांनी माझ्याकडे ३००/— रुपये मागीतल्याची खात्री झाली. तेव्हा पोलीस उप अधिक्षक पाटील साहेब यांनी मला तलाठी गायकवाड मॅडम यांना देण्यासाठी ३००/— रुपये हजर करण्यास सांगीतले.

त्यानंतर मी तलाठी गायकवाड मॅडम यांना देण्यासाठी माझे घरुन आणलेले ३००/—रु रक्कम पाटील साहेब यांचे समक्ष हजर केली. तेव्हा पाटील साहेब यांनी सदर नोटांना अ.पा.पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टचे वरील डाव्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंच क्र.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला पंच क्र.१ यांचेसह सदरची रक्कम तलाठी गायकवाड मॅडम यांना देण्यासाठी तलाठी कार्यालय, खडका येथे पाठविले होते. त्याप्रमाणे मी पंच क्र.१ यांचेसह तलाठी कार्यालय, खडका येथे गेलो होतो. सदर ठिकाणी तलाठी गायकवाड मॅडम यांना भेटलो. तेव्हा त्यांच्यात व माझेत माझे कामा संदर्भात चर्चा झाली. तेव्हा तलाठी श्रीमती गायकवाड मॅडम यांनी मला उजव्या हाताचा अंगठा व पहिल्या बोटाने इशारा करुन पैश्यांची मागणी केली.तेव्हा मी माझे जवळ असलेली लाच रक्कम रुपये ३००/—रु.माझे शर्टचे वरील डाव्या खिश्यातुन उजव्या हाताने बाहेर काढुन तलाठी श्रीमती गायकवाड मॅडम यांना तुम्ही सांगीतले प्रमाणे ३००/— रुपये लाच रक्कम त्यांचे समोर धरली असता त्यांनी सदर लाच रक्कम टेबलावर असलेल्या कि बोर्डवर ठेवण्यास सांगीतली. त्याप्रमाणे मी सदर लाच रक्कम कि बोर्डवर ठेवली. तेव्हा तलाठी श्रीमती गायकवाड मॅडम यांनी सदर लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने किबोर्ड वरुन उचलुन ती त्यांचे जवळील लाल रंगाचे पर्समध्ये ठेवुन घेतली. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास ईशारा केला. व मी कार्यालयाचे बाहेर येउन थांबलो. त्यानंतर पाटील साहेब व सापळा पथक यांनी तलाठी श्रीमती गायकवाड मॅडम यांना पंचासमक्ष १५.१८ वा.रंगेहाथ पकडले. त्यानंतर पाटील साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी तलाठी श्रीमती गायकवाड मॅडम यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगुन त्यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव मनिषा निलेश गायकवाड,वय ३८ वर्षे, व्यवसाय नोकरी (तलाठी),सजा खडका व साकरी,ता.भुसावळ,जि.जळगाव. रा.मोरेश्वर नगर,साकेगाव शिवार,भुसावळ (खाते महसुल, वर्ग ३) असे सांगितले. त्यानंतर तलाठी श्रीमती गायकवाड मॅडम यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पाटील साहेब, मी, दोन्ही पंच, सापळा पथक, तलाठी श्रीमती गायकवाड मॅडम असे आम्ही खाजगी वाहनाने जळगांव येथे गेलो. त्यानंतर अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव कार्यालयात उर्वरीत सापळा कारवाई केली आहे. तसा पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे तलाठी मनिषा निलेश गायकवाड यांनी मी खरेदी केलेल्या प्लॉटचे ७/१२ उताऱ्यावर नाव लावुन देण्याची नोंद घेण्याचे मोबदल्यात ३००/—रुपयांची लाच मागणी करुन सदर लाचेची रक्कम ३००/—रुपये तलाठी मनिषा निलेश गायकवाड यांनी पंचासमक्ष माझेकडुन दि.३१.०१.२०२३ रोजी १५.१८ वा. तलाठी कार्यालय, खडका,ता.भुसावळ येथे स्वत: स्विकारली. म्हणुन माझी तलाठी मनिषा निलेश गायकवाड यांचे विरुध्द फिर्याद आहे.

**फिर्यादीची सही**

(शेख अलताफ हुसैन मुकामरसुल)

**समक्ष**

31.1.2023

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**